# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/03/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :— यातील फिर्यादी नामे— अर्पित रामभाऊ भोजने वय ४२ वर्ष, रा. धनगवरी नगर पिपळा रोड नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्र. ०२/२०२२ कलम ३०२ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीची पत्नी व आरोपी नामे— शरद विठ्ठोबाजी धनोरकर, वय ३२ वर्ष रा. गढबर्डी मोहपा ता. कळमेश्वर हे सख्खे बहिण—भाऊ आहेत. **मृतक नामे— सौ. उज्वला अर्पित भोजने, वय ३३ वर्ष रा. धनगवरी नगर पिपळा रोड नागपूर** हिने आरोपीस नेहमी आई सोबत का भांडण करते असे हटकले याकारणा वरूण आरोपी व मृतक यांच्यात भांडण होवुन मृतकने आरोपीस विटेचा तुकडा फेकुण मारले. याकारणावरून आरोपीने चिडुन बासेच्या काठीने मृतकच्या डोक्यावर मारून गंभीर जखमी करून ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि शिवाजी मुंडे पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. दिनांक २४/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान मा. डीजे घुमरे न्यायाधीश यांनी वरील सदर गुन्हयात कलम ३०४ भादवि मध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी सफौ./ ८९ कडंबे पो.स्टे. कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. सावनेर :**— अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील कोठोडी येथे दिनांक २२/३/२०२३ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विजय शांताराम भुजाडे, वय ४६ वर्ष रा. कोठोडी याचा मुलगा नामे— प्रथमेश भुजाडे हा आपल्या गायी घेऊन चारण्याकरीता जात असतांना समोरून येणारी गाडी क्र. सी जे—१२/ए क्यु—००३० चे चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन गाडीने गायीला ठोस मारून अपघात केल्याचे फिर्यादीचे मुलाने सांगितले असता फिर्यादी यांनी गाडी क्र. सी जे—१२/ए क्यु—००३० चे चालक आरोपी क्र. १) नामे— सचिन शर्मा, रा. नागपुर यास फोन केला असता आरोपीने नुकसान भरपाई म्हणुन ३०००/— रूपये घेउन घ्या असे म्हटल्यावर फिर्यादी यांनी ‘‘मला पैसे देउ नका माझ्या गायीचा उपचार करा’’ असे म्हटल्यानंतर काही वेळाने आरोपी क्र १ यांनी फिर्यादी यास फोन करून ‘‘तुझ्या गायीचा उपचार करून घे तुला जे करायचे आहे ते करून घे’’ असे म्हणुन फिर्यादी यास फोनवर शिवीगाळ केली व नंतर आरोपी क्र १ यांनी कोठोडी गावात आरोपी क्र २) शेषनाग प्रसाद सोबत २० ते २५ अनोळखी इसमांनी गावात पाठवुन गावात कोण काय करतो असे बोलुन फिर्यादी व गावातील लोकांना मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, २७९, ४२९, ५०६, ५०७ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नागवे मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. मौदा :**— दिनांक २२/३/२०२३ चे २१.३० वा. ते दिनांक २३/३/२०२३ चे ५.३० वा. दरम्यान पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष १२ महीने ही १२ वी मध्ये शिक्षण घेत आहे दिनांक २२/३/२०२३ रोजी नेहमी प्रमाणे फिर्यादीचे घरचे सर्व झोपलेले होते तेव्हा सकाळी ५.०० वा दरम्यान कोणालाही काहीही न सांगता निघुन गेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी पिपळकर मॅडम मो. क्र. ८४२१९५६०६६ या करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल :**— दिनांक २३/०३/२०२३ चे १२.३० वा. ते १३.०० वा. दरम्यान पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी ही बडेगाव येथुन आपले बहीणी कडे पाहुणपणा करीता आपले मुलगी वय १९ वर्षे रा. बडेगाव ता. सावनेर जि. नागपुर हिचे सह आली होती दि. २३/०३/२०२३ रोजी फिर्यादी व तिचे बहीण कडले सर्वांनी जेवन खावन केले व मुलगी हिने कपडे धुतले व कपडे अंगणातील दोरीवर वाळु टाकण्याकरीता दुपारी १२/३० वा ते १३/०० वा. दरम्यान घराबाहेर आली. तेव्हा बडेगाव गावातील आरोपी नामे— १) मंगेश लक्ष्मन राउत व त्याचा मित्र २) गणेश मोहीते दोन्ही रा. बडेगाव ता सावनेर जि. नागपुर हे दोघे पांढऱ्या कलरची झायलो कार क्र. एम.एच—३१, डी.सी. —१४६१ घेवुन घराजवळ आले व फिर्यादीची मुलगी हिला ‘‘तुझेसोबत लग्न करायचे आहे’’ असे म्हणुन गाडीत बसवुन घेवुन गेले. मंगेश लक्ष्मण राउत व त्याचे मित्रासह झायलो कार ने ढवळापुर येथे येवुन मुलगी हिला लग्न करण्याचे हेतुने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. रूडे ब. नं. १६४६ मो.९९२३३५२६४६ हे करीत आहे.

# घरफोडी

**पोस्टे मौदाः—** अंतर्गत छत्तरपुर फार्म हाउस खेडी दिनांक २२/०३/२०२३ चे १९.०० वा. ते ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शिशुपाल भारत गेडाम, वय ३२ वर्ष, रा. चिखला माईन्स ता. तुमसर भंडारा हे छत्तरपुर फार्म हाउस येथे मेंटनंन्सचे काम करतात फिर्यादीचे मालक नामे— सुरज अग्रवाल यांचे विल्ला क्र. ३३ मधील समोरील दरवाजाचे कुलुप तोडुन सॅमसंग कंपनीची एलईडी टिव्ही किंमती अंदाजे १२,०००/—रु. एक्सटेंशन बॉक्स सोबत लागलेला केबल वायर किंमती अंदाजे २०००/—रु व ईलेक्ट्रीक शिगडी किंमती अंदाजे १०००/—रु व हक्का पॉट किंमती अंदाजे १०००/—रु असा एकुण १६००००/—रुपयाचा मुद्देमाल तसेच विल्ला क्र. ३२ मधील स्वयंपाक खोली मधील वापरते १ ओवन अंदाजे किंमती २०००/—रु व वापरते १ गॅस व एच पी कंपनीचा सिलेंडर दोन्ही मिळुन ४०००/—रु व वापरते १ तंदुरी मशीन किंमती अंदाजे ८०००/— रु असा एकुण १४०००/—रु दोन्ही मिळुन ३०,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ११७४ यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**